# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

### १३) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३.०४.२०२६

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (०६/०४/२०२६ ते १२/०४/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१४/०४/२०२६ ते १८/०४/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ४० | ४० | ४० | ४१ | ४१ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २६ | २७ | २७ | २६ | २५ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | ० | १ | ३ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४६ | ४४ | ४७ | ४९ | ४५ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४४ | ३९ | ४२ | ४४ | ४० |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १५ | १५ | १६ | १६ | १० |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस कोरडे राहण्याची शक्यता आहे. तसेच कमाल तापमानात १ ते २ अंश से. ने वाढ होण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) मातीतील ओलावा वाचवण्यासाठी अच्छादनाचा वापर करावा, त्याकरीता गवताचा/ पिकाचे अवशेष/ पॉलिथीनचा उपयोग करावा.<br>३) कमाल तापमानात १ ते २ अंश सेने वाढ होण्याची शक्यता . असल्याने शेतकऱ्यांनी स्वताची व जनावराची काळजी घ्यावी. |
| संदेश | | कमाल तापमानात १ ते २ अंश से. ने वाढ होण्याची शक्यता आहे. |
| भुईमूग | शेंगा भरण्याची अवस्था | ६० ते ७० दिवसानंतर शेंगा पोसण्याची अवस्था असल्याने संरक्षित पाण्याची पाळी दयावी.<br>मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान आणि हवेमध्ये जास्त आद्रता राहिल्यामुळे भुईमूग पिकामध्ये पानावरील टिक्का व तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी फ्ल्युबेनडॅमाईड ३.५% + हेक्झाकोनॅझोल ५% डब्ल्यु.जी. २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| ऊस | वाढीची अवस्था | ऊस पिकातील खोडकिडीच्या नियंत्रणासाठी, क्लोरान्ट्रानिलिप्रोल १८.५ एस.सी. @ ४ मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| भाजीपाला पिके | | उन्हाळी भाजीपाला पिकांवर माव्याचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे म्हणून सतत देखरेख ठेवावी आणि सुरुवातीच्या प्रादुर्भावाच्या निरीक्षणावर कडुनिंबावर आधारित कीटकनाशकांची फवारणी करावी. |
| भाजीपाला पिके | | नुकत्याच लागवड झालेल्या रोपाना सावली करण्याची व्यवस्था करावी.<br>गरम वाऱ्याला अडथळा निर्माण होण्याकरीता शेताच्या कडेला, बांदावर व्यवस्था करावी. |
| फळ पिके | | कमाल तापमानात होत असलेल्या वाढीमुळे उभ्या पिकांना पाण्याचा ताण बसणार नाही याची दक्षता घ्यावी त्याकरीता पिकांना आवश्यकतेनुसार हलके सिंचन द्यावे.<br>नविन लागवड केलेल्या फळाबागांच्या कलमी रोपांचे उन्हापासून संरक्षण करावे.<br>गंभीर वाढीच्या टप्प्यावर सिंचनाची वारंवारता वाढवावी. |
| पशुसंवर्धन | | जनावरांना सावलीत ठेवावे आणि पिण्यास भरपूर स्वच्छ आणि थंड पाणी द्यावे.<br>जनावरांकडून सकाळी १२ ते दुपारी ३ वाजेच्या दरम्यान काम करू घेवु नये.<br>हिरवेगवत, प्रथिनेयुक्त, खनिजमिश्रणआणिमीठयुक्त खाद्य द्यावे.<br>जनावरे सकाळी किवा सायंकाळी चरावयास न्यावे.<br>तापमान कमी करण्यासाठी शेडचे छत पेंढ्याने झाकावे तसेच भिंतींना पांढरे रंग द्यावा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |
| कुक्कुटपालन | | पोल्ट्री हाऊसमध्ये पडदे लावावेत आणि हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. तसेच भिंतींना पांढरे रंग द्यावा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : १३.०४.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा

प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.